नि.दि.दा.क्र.१४८/२०१६
नि.क्र.८७

प्रतिवादी करीता सा.क्र.३

<u>प्रतिवादीकरिता पुढील सरतपास विधीज्ञ श्री.एम.आर.जगताप यांच्या वतीने शपथेवर सुरू</u>

३. दि.२८/१२/१९८१ चे खरेदीखत नोंदणी क्र.१७९३/१९८१, मला आता दाखविले. ते खरेदीखत मी बाबूराव ढगे यांना, सर्वे क्र.४०/क मधील ४ एकर २२ गुंठे क्षेत्र विक्री केले म्हणून बाबूराव ढगे यांच्या हक्कात करून दिलेले आहे. त्या खरेदीखतावर सर्वे क्र.४०/क मधील ४ एकर २२ गुंठे क्षेत्र बाबूराव ढगे यांना विक्री करणार म्हणून मी माझी सही केली आहे. त्यावर बाबूराव हुसनाळे, गोविंदराव माने व शिवाजी पाटिल यांनी साक्षीदार म्हणून सहया केल्या. त्या खरेदीखतावर त्यांच्या सहया आहेत. त्या सहया बाबूराव हुसनाळे, गोविंदराव माने व शिवाजी पाटिल यांनी माझ्या समोर केल्यामुळे मी ओळखतो. दि.२८/१२/१९८१ चे खरेदीखत नोंदणी क्र.१७९३/१९८१ मधील मजकूर खरा व बरोबर आहे. ते खरेदीखत तेच आहे. ते खरेदीखत **<u>नि.क्र.८८</u>** वर आहे.

<u>वादीकरिता उलट तपास विधीज्ञ श्री.यु.एस.जाधव यांच्या वतीने</u>

४. मी व बाबूराव ढगे यांच्यामध्ये झालेल्या दि.२८/१२/१९८१ च्या खरेदीखत नोंदणी क्र.१७९३/१९८१ होण्यापूर्वीच माझे व प्रतिवादी बाबूराव ढगे यांच्यामध्ये जमीन खरेदीविक्रीचा ठराव झाला होता हे म्हणणे खरे आहे. तो ठराव किती रुपये किंमतीच्या मुद्रांकावर झाला होता हे मला माहित नाही. तो ठराव खरेदीखत नोंदणी क्र.१७९३/१९८१ होण्याच्या किती दिवसांपूर्वी झाला होता हे मला आठवत नाही. माझे व प्रतिवादी बाबूराव ढगे यांच्यामध्ये झालेल्या ठरावाच्या इसारापोटी मी काहीही रक्कम घेतलेली नाही. तेजाबाई या खरेदीखत नोंदणी क्र.१७९३/१९८१ ला हजर होत्या. खरेदीखत नोंदणी क्र.१७९३/१९८१ वर तेजाबाई यांची सही आहे किंवा कसे हे मला आठवत नाही. खरेदीखत नोंदणी क्र.१७९३/१९८१ होण्याच्या एक ते दोन वर्षे अगोदर तेजाबाई व प्रतिवादी बाबूराव यांचे लग्न झाले होते. एकूण ४ एकर २२ गुंठे क्षेत्र रू.१५,०००/- च्या मोबदल्यात देण्याचे ठरले होते. खरेदीखत नोंदणी क्र.१७९३/१९८१ ची मोबदला रक्कम प्रतिवादी बाबूराव यांनी कोठून आणली हे मला माहित नाही. खरेदीखताशिवाय प्रतिवादी बाबूराव यांच्याकडून मला मोबदला रक्कम मिळाली म्हणून ईतर पावती आमच्यामध्ये झालेली नाही. माझी व प्रतिवादी बाबूराव यांची जुनी ओळख आहे हे म्हणणे खरे आहे. प्रतिवादी बाबूराव यांना युवराज हा मुलगा होता हे म्हणणे खरे आहे. मी दैवताबाई यांना ओळखत नाही व त्यांना पाहिलेलेही

नाही. युवराज यांच्या जन्मदात्या आईचे नाव दैवताबाई होते हे मला माहित नाही. तेजाबाई यांना मुलबाळ नाही हे म्हणणे खरे नाही, साक्षीदार स्वत: सांगतात युवराज त्यांचाच मुलगा आहे. युवराज सद्या हयात नाही. युवराज यांना मुलगा शुभम व रागिनी मुलगी असे वारस आहेत हे म्हणणे खरे आहे. ते औरंगाबाद येथे राहतात. इ.स.सन-१९८१ नंतर दावा मिळकतीत जाण्याचे मला प्रसंग आले होते. दावा मिळकतीच्या पश्चिमेस – माझे चुलत भाऊ किसन, अनंत व भिमराव यांच्या जमीनी आहेत, दक्षिणेस- नागनाथ माने यांची जमीन व पूर्वेस- बाबूराव कुंभार यांची जमीन आहे. दावा मिळकतीच्या उत्तरेस- शिवाजी माने यांची जमीन आहे. मी आता सांगितलेल्या चतु:सिमा खरेदीखत नोंदणी क्र.१७९३/१९८१ होताना सांगितल्या होत्या किंवा कसे हे मला आठवत नाही. मी तेजाबाई यांच्या सांगण्यावरून साक्ष देण्यास आलो हे म्हणणे खरे आहे. मी खोटा सरतपास दाखल केला हे म्हणणे खरे नाही.

<u>उलटतपास पूर्ण</u>.

<u>फेरतपास नाही</u>.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD Date: 2025.07.09 17:57:02 +0530

(रवि वि.पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक ०९/०७/२०२५.